महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती—४४४६०२
Email: divsecamt@rediffmail. Tel. 0721-2662647,
Website: sscboardamravati.in

पत्र.क्र./अविम/उमाप / 220
अमरावती.
दिनांक — ०१/०५/२०२६

प्रति,
मा. उपसंचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
अमरावती विभाग, अमरावती.

विषय — फेब्रु/मार्च २०२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचा (इ.१२वी) निकाल व विविध तपशिल जाहीर करणे बाबत...
संदर्भ — राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा —२/१८३३, पुणे, दि. ३०/०४/२०२६

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, फेब्रु/मार्च २०२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) परीक्षेचा निकाल व विविध तपशिल शनिवार, दिनांक ०२ मे २०२६ रोजी दूपारी १:०० वाजता जाहीर करण्यात येत आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील पाचही जिल्हयातील वृत्तपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

(सोबत प्रकटन जोडलेले आहे.)

S. Salunke 01.05.2026
(संगीता साळुंके)
विभागीय सहसचिव,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती.

**प्रतिलिपी** :—
१. शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती.
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम.
३. प्राचार्य सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय, अमरावती विभाग, अमरावती.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४.

# प्रकटन

**विषय : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या निकालाबाबत**

---

मंडळामार्फत **फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये** आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या विहित कार्यपध्दतीनुसार जाहीर करण्यात येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचा निकाल खालील अधिकृत संकेतस्थळांवर शनिवार दिनांक ०२ मे, २०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे. अधिकृत संकेतस्थळांचे पत्ते खालीलप्रमाणे आहेत.

1. https://results.digilocker.gov.in
2. https://mahahsscboard.in
3. https://hscresult.mkcl.org
4. https://results.targetpublications.org
5. https://results.navneet.com
6. https://www.tv9marathi.com
7. https://education.indianexpress.com/boards-exam/maharashtra-hsc-12-results.

परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण उपरोक्त संकेतस्थळांवर उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रत (प्रिंट आऊट) घेता येईल. त्याचप्रमाणे Digilocker App मध्ये Digital गुणपत्रिका संग्रहित करून ठेवण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

तसेच https://mahahsscboard.in ( in college login ) या संकेतस्थळावर कनिष्ठ महाविद्यालयांना त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयाचा एकत्रित निकाल उपलब्ध होईल.

## सदर निकालाबाबतचा अन्य तपशील खालीलप्रमाणे -

१) ऑनलाईन निकालानंतर उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वत:च्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळ https://mahahsscboard.in वरुन स्वत: किंवा कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक अटी/शर्ती व सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत.

**गुणपडताळणीसाठी व** उत्तरपत्रिकांच्या **छायाप्रतीसाठी** रविवार दिनांक ०३/०५/ २०२६ **ते** रविवार दिनांक १७/०५/२०२६ **पर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने करता येईल.** त्यासोबतच ऑनलाईन पध्दतीने शुल्क Debit Card/ Credit Card/ UPI/ Net Banking यादृारे भरता येईल.

२) **फेब्रुवारी-मार्च २०२६** च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र **(इ.१२ वी)** परीक्षेच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य आहे. छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्दूतीचा अवलंब करुन विहित नमुन्यात विहित शुल्क भरुन संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

३) **फेब्रुवारी-मार्च २०२६** च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र **(इ.१२ वी)** परीक्षेत सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लगतच्या तीन संधी **(जून-जुलै २०२६, फेब्रुवारी-मार्च २०२७ व जून -जुलै २०२७) श्रेणी/गुणसुधार (Class Improvement Scheme)** योजनेअंतर्गत उपलब्ध राहतील.

४) जून-जुलै २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या पुरवणी परीक्षेसाठी पुनर्परिक्षार्थी, श्रेणीसुधार व खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मंडळाच्या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरुन घेण्याच्या तारखांचे परिपत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

दिनांकः ३०/०४/२०२६

(डॉ. दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे-०४